पशुआरोग्य

# दुग्धज्वराची कारणे, लक्षणे आणि उपचार




**डॉ. गणेश काळुसे**
(मो.नं. ९८२२२४७८९५)
विषय विशेषज्ञ (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय),
कृषि विज्ञान केंद्र, यवतमाळ






दुग्धज्वर संकरित गायी व म्हशींमध्ये मोठ्या प्रमाणात आढळतो. रक्तातील कॅल्शियमच्या कमतरतेमुळे हा रोग होतो. मुख्यत: ही कमतरता ५ ते १० वर्षे वयाच्या गायी आणि म्हशींमध्ये जास्त आढळून येते. गायी आणि म्हशी विल्यानंतर ४८ तासांच्या आत अचानक कॅल्शियमचे प्रमाण कमी होते. विल्यानंतर १ ते ३ दिवसांत रोगाची लक्षणे दाखविण्यास सुरुवात करते. अस्वस्थता आणि अशक्तपणा येऊन जनावर खाली बसते; या संक्रमणाची अशी मुख्य लक्षणे असतात.

**या** आजारास दुग्धज्वर, दुधाचा ताप किंवा मिल्क फीवर असे नाव असले, तरी त्यामध्ये जनावराचे तापमान नेहमीपेक्षा कमी झालेले असते व जनावरास ताप नसतो. आहाराचे योग्य व्यवस्थापन करून व पशुतज्ज्ञांकडे योग्य उपचार करून हा आजार टाळता येतो.

दुग्धज्वर किंवा मिल्क फीवर हा आजार साधारणपणे जास्त दूध देणाऱ्या गायी आणि म्हशींमध्ये आढळून येतो. जास्त दूध देणारी जनावरे त्यांच्या तिसऱ्या ते पाचव्या वितामध्ये या आजारास बळी पडण्याचे प्रमाण मोठे आहे. पहिल्या किंवा दुसऱ्या वितामध्ये जनावरे कमी वयाची किंवा तरुण असतात. या वयामध्ये जनावराची चाऱ्यातील क्षार शोषण्याची क्षमता तसेच हाडांमध्ये असलेले जास्त कॅल्शियमचे प्रमाण यामुळे हा आजार होण्याचा धोका फार कमी असतो. दुग्धज्वर संकरित गायी व म्हशींमध्ये मोठ्या प्रमाणात आढळतो. रक्तातील कॅल्शियमच्या कमतरतेमुळे हा रोग होतो. मुख्यतः ही कमतरता ५ ते १० वर्षे वयाच्या गायी आणि म्हशींमध्ये जास्त आढळून येते. गायी आणि म्हशी विल्यानंतर ४८ तासांच्या आत अचानक कॅल्शियमचे प्रमाण कमी होते. विल्यानंतर १ ते ३ दिवसांत रोगाची लक्षणे दाखविण्यास सुरुवात करते. अस्वस्थता आणि अशक्तपणा येऊन जनावर खाली बसते; या संक्रमणाची अशी मुख्य लक्षणे असतात.

**आजाराची कारणे :** * रक्तातील कॅल्शियमचे प्रमाण कमी होणे, हे या आजाराचे मुख्य कारण आहे. यासाठी खालील गोष्टी कारणीभूत ठरतात. * गाभण किंवा दुधाळ जनावरांतील कॅल्शियमची वाढलेली गरज. * चाऱ्यातून कमी प्रमाणात कॅल्शियम मिळणे. * जनावरांच्या आहारात कॅल्शियम व स्फुरदाचे योग्य प्रमाण नसणे (२:१) तसेच 'ड' जीवनसत्त्वाची कमतरता. * आतड्यांमधून चाऱ्यातील कॅल्शियमचे शोषण न होणे. * जनावर विण्यापूर्वी गाभण काळात गरजेपेक्षा जास्त कॅल्शियम देणे.* शरीरात पॅराथार्मोन या संप्रेरकाची कमतरता किंवा कॅल्शिटोनिनचे अधिक प्रमाण. * आहारात ऑक्झेलेट आणि मॅग्नेशियमचे प्रमाण अधिक असणे. * विण्यापूर्वी किंवा विल्यानंतर जनावराची होणारी उपासमार तसेच विण्याच्या सुमारास जनावरावर येणारा ताण.

शेतकरी ऊसाच्या हंगामात दुधाळ जनावरांना ऊसाचे वाढे जास्त प्रमाणात खाऊ घालतात. वाढ्यांमध्ये असणारे ऑक्झेलेट चाऱ्यातील कॅल्शियमबरोबर संयुग तयार करून शेणावाटे बाहेर निघून जाते. त्यामुळे जनावरास कॅल्शियम मिळत नाही. यामुळे ऊसाचे वाढे हे कॅल्शियम कमी होण्याच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे. हिवाळा हा म्हशींचा विण्याचा हंगाम असतो आणि यामध्ये जास्त थंडी, हिरवा चारा न मिळणे व जास्त दूध उत्पादन या कारणांनी हा आजार मोठ्या प्रमाणात आढळतो.

**आजाराची लक्षणे :** प्रथम अवस्था : ही अवस्था फार कमी काळ राहत असल्यामुळे बऱ्याचदा लक्षात येत नाही. यामध्ये जनावर सुस्त होते आणि चारा खाणे व दूध देणे कमी करते. डोके हलविणे, सतत जीभ बाहेर काढणे, दात खाणे, अडखळत चालणे अशी लक्षणे दिसू लागतात.

द्वितीय अवस्था : या अवस्थेत जनावर खाली बसते. ते उभे राहू शकत नाही. बसलेल्या अवस्थेत मान एका बाजूला वळवते. शरीर थंड पडते, श्वासोच्छ्वास व नाडीचे ठोके जलद होतात, नाकपुड्या कोरड्या पडतात. शेण टाकणे व लघवी करणे बंद होते. दूध देणे बंद होते, रवंथ करणे थांबून पोट फुगते. आवाज दिल्यास किंवा उठविण्याचा प्रयत्न करूनही जनावर उभे राहत नाही.

तिसरी अवस्था : या अवस्थेमध्ये जनावरे आडवी पडतात. श्वासोच्छ्वास मंद होतो. डोळा लागला असता पापण्यांची हालचाल होत नाही. या अवस्थेत उपचार झाला नाही तर जनावर दगावते. उपचार कॅल्शियम बोरोग्लुकोनेट २५ टक्के इंजेक्शन साधारण १ मि.लि. प्रतिकिलो वजन या प्रमाणात शिरेतून दिल्यास जनावरे बरी होतात. औषध वेगाने किंवा अधिक प्रमाणात दिल्यास कॅल्शियमची विषबाधा होते. यासाठी इंजेक्शन हळुवारपणे देण्याची काळजी पशुवैद्यकाने घेतली पाहिजे. काहींमध्ये क्वचितच दुसऱ्या आणि तिसऱ्या दिवशी इंजेक्शन देण्याची गरज भासते. पुरेसा किंवा तत्काळ उपचार न होणे किंवा कमी प्रमाणात इंजेक्शन देणे यांमुळे आजार बरा होत नाही. आजारातून बरे होण्याचे लक्षण म्हणजे जनावर उठून उभे राहते. नाकपुड्या ओल्या होऊन शरीराचे तापमान पूर्ववत होते. चारा खाणे, लघवी करणे आणि शेण टाकणे सुरू होते.

**प्रतिबंधात्मक उपाय :** * विण्यापूर्वी जनावरास योग्य आहार द्यावा. * गाभण काळात खूप जास्त प्रमाणात खुराक देऊ नये, तसेच उपासमारही होता कामा नये. * गाभण काळात जनावरांना थोडेसे फिरवल्यास व्यायाम मिळतो व कॅल्शियमची चयापचय क्रिया सुरू राहते. * गाभण तसेच विलेल्या जनावरास साधारण ५० ग्रॅम खनिज मिश्रण खुराकातून द्यावे. * विण्यापूर्वी साधारण एक आठवडा जीवनसत्त्व 'ड'चे इंजेक्शन देणे फायदेशीर ठरते. * जनावर विल्यानंतर शिरेवाटे किंवा खुराकातून कॅल्शियम दिल्यास उपयुक्त ठरते. ■